जा.क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/२०१७/5128
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक :- 28/०८/२०१७

प्रति,

**प्राचार्य,**
**सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :-** लघुलेखन सत्र जुलै २०१७ ते डिसेंबर २०१७ साठी प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाईन करणेबाबत.
**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०१७/३७५५, दिनांक - २७/०६/२०१७ चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रानुसार लघुलेखन (शॉर्टहॅण्ड) साठी मान्यताप्राप्त संस्थांमधून जुलै २०१७ ते डिसेंबर २०१७ या सत्रासाठी प्रवेशित झालेल्या उमेदवारांची परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोदंणी करण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट २०१७ ते ४ सप्टेंबर २०१७ या कालावधीत लिंक उपलब्ध करून देण्यात येत आहे.या कालावधीत परिषदेच्या संकेतस्थळावर प्रवेशित विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती भरावी. संस्थांनी प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संस्थेच्या जनरल रजिस्टरप्रमाणे नोंदविणे आवश्यक आहे. लघुलेखन अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र जनरल रजिस्टर ठेवण्यात यावे.

प्रवेशित विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी विहित कालावधीत संस्थांनी करावी. आवेदनपत्रे भरण्यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाईल. संकेतस्थळावर संस्थांनी नोंदणी केलेल्याच विद्यार्थ्यांचीच ऑनलाईन आवेदनपत्र भरता येतील याची नोंद घ्यावी.

(सुखदेव डेरे)
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

**प्रत माहितीस्तव:-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्य), जि.प.(सर्व)
३. शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम)

C:\Documents and Settings\NET\Desktop\AUGUST-2017 (GCC)\PRASIDHIPATRAK-1.docx